शेतकरी व्यक्तीगत अपघात विमा योजनेसाठी
कार्यान्वयीन यंत्रणा निश्चित करणेबाबत

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक -शेअवि २००७/प्र.क्र.१३२/११-अे.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ जुलै,२००७

**शासन निर्णय :**

शेतकरी व्यक्तीगत अपघात विमा योजना राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजना सन २००७-०८ पासून पुढे चालू ठेवणे प्रस्तावित आहे. त्यासाठी आयुक्त (कृषि) यांचामार्फत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर निविदा स्विकारून योजना राबविण्यासाठी विमा कंपन्या, विमा हप्त्यांचे दर, तसेच कुलरचना व अटी निश्चित करणे आवश्यक आहे.

२. सदर निविदा अंतिम करण्यासाठी प्रधान सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली पुढील प्रमाणे एक समिती नियुक्त करण्यात येते.

| | |
|---|---|
| १) प्रधान सचिव (कृषि) | अध्यक्ष |
| २) अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) | सदस्य |
| ३) प्रधान सचिव (नियोजन) | सदस्य |
| ४) प्रधान सचिव (गृह) | सदस्य |
| ५) प्रधान सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ६) आयुक्त (कृषि) | सदस्य |

समितीने आयुक्त (कृषि) व भारतीय कृषि विमा यांच्याशी विचार विनिमय करून त्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या अडचणींचा विचार करून शासनास शिफारशी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( शु.अ.गोसावी )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन,
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रति,

अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, ...